**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ५६/२०११</u>**
**<u>निशाणी ८१ पुढे सुरु.....</u>**

शपथेवर पुढे सुरु –

**<u>वादी तर्फे साक्षीदार क्र. २ चा उलटतपास प्रतिवादी तर्फे विधीज्ञ श्री. एस.डी.काणे यांच्या मार्फत</u>**

४. वाद मिळकतीची खरेदी झाली त्यावेळी मी त्या ठिकाणी हजर होतो. शेतीची सरकारी किंमत आणि बाजारभाव किंमत वेगवेगळी असते ते मला समजते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईने खेरदी केली त्या खरेदीखतात खरेदीची सरकारी किंमत आणि बाजारभाव किंमत दोन्ही लिहिलेल्या होत्या. खरेदीखतात लिहिलेली खरेदीची किंमत माझे समक्ष दिली गेली होती. सदर किंमत मी देण्यापुर्वी स्वतः मोजली नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, माझ्या आईने मोजली होती. माझी आई इयत्ता २ री पर्यंत शिकलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीच्या दिवशी माझ्या वडीलांचा मृत्यु झाला होता. खरेदीच्या दिवशी माझे वडील हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीच्या दिवशी माझ्या आईने किती रक्कम दिली मला माहित नाही. माझ्या आईने रक्कम रु. ६०,०००/– दिले होते. सदर रक्कम दिल्याचे मला ऐकुन माहिती आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, माझ्या आईने सांगितले होते.

प्रश्न – तुमच्या आईचे बँकेत खाते आहे का ?
उत्तर – त्यावेळी नव्हते.

माझ्या आईने शेतीतुन आणि मोलमजुरी करुन जमा केलेले पैसे होते. त्यावेळी माझ्या आईल मोलमजुरी किती मिळत होती मला माहित नाही. माझ्या वडीलांकडे ४ एकर शेती आहे.

५. हे म्हणणे खरे नाही की, ज्या ज्या वेळी वाद मिळकतीचा विषय निघाला त्यावेळी प्रतिवादी भानुदासने सदरचे शेत त्यांच्या मालकीचे आहे असे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी भानुदास आणि श्याम भिरड यांचा सदर वाद शेतीबाबत

व्यवहार झालेला असल्याचे मला त्या दिवशी माहिती होते. खरेदीच्या दिवशी वाद शेतीच्या ७/१२ सदरी मालक व ताबेदार म्हणुन कोणाच्या नावाची नोंद होती ते मी पाहिले होते. हे म्हणणे खरे आहे की, वाद शेतीच्या नमुना ७ मध्ये मालक म्हणुन श्याम भिरडच्या नावाची नोंद असल्याचे मी पाहिले होते. हे म्हणणे खरे नाही की, वाद शेतीच्या नमुना १२ मध्ये ताबेदार म्हणुन भानुदास अघडते यांचे नाव होते. त्या दिवशी मी कोणत्या वर्षाचा ७/१२ पाहिला होता मला सांगता येणार नाही. खरेदीखतासोबत वाद शेतीचा ७/१२ लावलेला नव्हता. शेत विकत घेण्यापुर्वी किंवा घेते वेळी शेतीचा ७/१२ उतारा पाहणे आवश्यक आहे ही बाब मला व माझ्या आईला माहिती नाही. शेत विकत घेण्यापुर्वी मी शेताचा मालकी हक्काबाबत व नोंदीबाबत चौकशी केली होती.

प्रश्न – तुम्ही चौकशी कोणाकडे केली ?
उत्तर – मी चौकशी गावात केली.

मी कोणती कोणती कागदपत्रे पाहुन खरेदी केली ते मला सांगता येणार नाही. श्याम भिरड शेतीचा पुर्वीचा मालक होता, त्याचेकडुन त्याचे खरेदीची मुळ प्रत मी खरेदी घेण्यापुर्वी श्याम भिरडकडुन प्राप्त करुन घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, ज्या दिवशी खरेदी झाली त्या दिवशी शेताचा ताबा श्याम भिरडकडे नसुन भानुदास अघडतेकडे होता.

६. वडीलांचे ४ एकर शेती मला समजते तेव्हापासुन मी वहिती करतो. हे म्हणणे खरे आहे की, गावातील तलाठी सरकारी दप्तरी नोंद घेण्यापुर्वी जागेवर येवुन ताबेदारबाबत चौकशी करुन तशी नोंद घेत असतो.

७. माझ्या आईने प्रस्तुत दावा कशासाठी केला त्याची मला व्यक्तीशः माहिती आहे. दावा प्रलंबित असतांना आम्ही न्यायालया मार्फत पोलीस मदत घेतली होती. आदेशाप्रमाणे पोलीस शेतात आले त्यावेळी मी व माझी आई तेथे हजर होतो. पोलीस आल्यावर आजुबाजुच्या शेतातील ताबेदार आणि इतर काही लोक तेथे जमा झाले होते. तेथे जमलेल्या लोकांकडे पोलीसांनी चौकशी केली नाही. पोलीसांनी लिखापढी केली नाही.

प्रश्न – पोलीस आले त्यावेळी भानुदास, त्याची पत्नी आणि मजुर वाद शेतात काम करीत होते ?

उत्तर – ते त्यांच्या शेतात काम करीत होते.

हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी तेथे येवुन अहवाल तयार केला. मला माहित नाही की, पोलीसांनी तयार केलेला अहवाल प्रतिवादी भानुदासने न्यायालयात दाखल केलेला आहे किंवा कसे. अहवाल दाखल आहे किंवा नाही त्याबद्दल मला माझी आई व वकीलांनी सांगितले नाही. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखत केल्यापासुन ते दावा दाखल करेपर्यंत श्याम भिरडने वाद शेतीचा ताबा आम्हाला दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा दाखल केला त्या दिवशी आमच्या कडे वाद शेतीचा ताबा नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, भानुदासने तो मालक असल्याने मी ताबा देत नाही असे सांगितल्यामुळे आम्ही भानुदास विरुध्द दावा दाखल केला. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, भानुदासने कधीही सांगितले नाही.

प्रश्न – भानुदासच्या विरुध्द दावा दाखल करण्याचे काय कारण आहे ?

उत्तर – तो आम्हाला पेरणी करण्यासाठी आणि वहिती करण्यासाठी त्रास देत होता म्हणुन दावा दाखल केला.

८. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखत केल्यापासुन ते दावा दाखल करेपर्यंत शेतातील ७/१२ च्या नमुना १२ मध्ये भानुदासचे नाव आहे. खरेदीखत केल्यापासुन ते दावा दाखल करेपर्यंत वाद शेताचे ७/१२ उतारे मी दाव्यात दाखल करुन शकतो.

**प्रश्न – ७/१२ मधील नोंदी खऱ्या असतात ? (सदर प्रश्नावर वादीच्या वकीलांनी प्रश्न मोघम स्वरुपाचा असल्याने आक्षेप नोंदविला. त्यावर प्रतिवादीच्या वकीलांनी सदर प्रश्न मोघम नसुन सदर प्रश्नात मी बदल करु शकत नाही असे सांगितले.) (सदर प्रश्नावर दोघांचा युक्तिवाद ऐकुन प्रतिवादीच्या वकीलांनी सदर प्रश्न मागे घेतला. )**

९. हे म्हणणे खरे आहे की, खरेदी करण्यापुर्वी शेतीच्या ७/१२ च्या नोंदीची खात्री करुन घेतली पाहिजे. मला माहित नाही की, ७/१२ मध्ये मालक व्यतिरिक्त नमुना १२ मध्ये इतर व्यक्तीच्या नावाची नोंद असल्यास ती शेती विकत घेणे योग्य ठरत नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस ज्यावेळी शेतात आले त्यावेळी पहिल्यांदा

आम्हाला वाद शेतीचा ताबा मिळाला, त्यापुर्वी वाद शेतीवर आमचा ताबा नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

PATIL DIPMALA MAHENDRA
Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2025.08.29 11:19:34 +0530

दिनांक : २८/०८/२०२५.
ठिकाणः बाळापूर

( श्रीमती डी. एम. पाटील )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
बाळापूर.